# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय शिक्षण मंडळ, नागपूर

## M.S.BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION NAGPUR DIVISIONAL BOARD, NAGPUR

दूरध्वनी क्रमांक ;EPBX 0712-2565403 /2560209 /2553401 /2553360 FAX NO.0712-2561775

विभागीय अध्यक्ष : 2560319 /2562766 विभागीय सचिव : 2560319/2560166

ई मेल—msboardnagpur@gmail.com


पत्र क्र. नाविमं/प.उ.मा./3132

नागपूर दि.28/29/08/ 2018

**प्रति,**

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,
शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

विषय :— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ 12 वी) परीक्षेची आवेदनपत्रे स्वीकारणेबाबत, सरल प्रणाली अंतर्गत विविध पोर्टलवर माहिती भरणे व ती अंतिम करणेबाबत.

संदर्भ :— 1) शासन निर्णय क्र. ई गव्ह 1517/प्र.क्र 19/संगणक दि 14/08/2017.
2) शासन पत्र क्र. प्रवेश 2017/ प्र.क्र. 250/एस.डी.2 दि. 09/08/2018.
3) राज्य मंडळ पत्र क्र. रा.मं./परीक्षा—3/4417 दि. 18/20 /08/2018.
4) राज्य मंडळ पत्र क्र. रा.मं./परीक्षा—3/4429 दि. 18/21 /08/2018.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्र क्र.1 व 2 आणि राज्य मंडळ पत्र क्र. 3 अन्वये कळविण्यात येते की, संदर्भांकित शासन पत्र क्र. 2 पत्रातील मुददा क्र. 6 नुसार सर्व उच्च माध्यमिक शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांची सरल मधील माहिती दिनांक 30 सप्टेंबर पर्यत अपडेट करणे आवश्यक आहे. उच्च माध्यमिक शाळांनी /कनिष्ठ महाविद्यालयांनी मंजूर प्रवेश क्षमता, प्रवेशित विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची सरलमधील माहिती विचारात घेऊनच इ. 12 वी परीक्षा फेब्रु/मार्च 2019 ची आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही करावी.

शासन पत्र क्र. प्रवेश 2017/ प्र.क्र. 250/एस.डी.2 दि. 09/08/2018नुसार सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य, शाळा/कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग यांना कळविण्यात येते की, इ. 12 वी मध्ये मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश घेतला असल्यास असे प्रवेश रदद करून मंजूर प्रवेश क्षमतेच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातच प्रवेश घेण्यात यावा अशा सूचना आपल्या स्तरावरून सर्व पालकांना/विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात .सर्व शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांची सरल मधील माहीती दि. 30 सप्टेंबर पर्यत अपडेट करून शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांची मंजूर प्रवेश क्षमता, प्रवेशित विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची सरल मधील माहिती विचारात घेऊनच इ.12 वी फेब्रु/मार्च 2019 परीक्षेची आवेदनपत्रे स्वीकारले जातील.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांचेवर कारवाई करण्यात येईल तसेच इ 12 वी च्या परीक्षेस बसण्याची संधी न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील याची नोंद घ्यावी.

संदर्भीय पत्र क्र. 1 शासन निर्णयास अनुसरून कळविण्यात येते की, शासन निर्णयातील मुददा क्र. 15 (1) नूसार इ. 10 वी व 12 वी परीक्षेची आवेदनपत्रे **SARAL DATA** वरून **Auto Populate** पध्दतीने घेऊन सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी दि. 01/09/2018 पर्यंत **SARAL** ची माहिती तपासुन अपडेट करून फेब्रु/मार्च 2019 मध्ये आयोजित करावयाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ 10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ 12 वी) परीक्षांची आवेदनपत्रे **SARAL DATA** वरूनच भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच इ. 10 वी / इ. 12 वी आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही चालु असतांना शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना काही अडचणी आल्यास या कार्यालयात हेल्प लाईन सुरू करण्यात येत असुन मोबाईल क्र. 9890464248, 9923699244, 9822699317, 9922856680 वर संपर्क साधावा.

( रविकांत देशपांडे )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**सहपत्रः–** **1)** शासन पत्र क्र. प्रवेश 2017क्र.250/एस.डी.2 दि.09/08/2018 ची छायाप्रत
**2)** **राज्यमंडळाचे पत्र** दि.20/08/2018 व 21/08/2018 च्या पत्राची छायापत्र

**प्रतिलिपीः**–1) सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक वउच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,भांबुर्डा,पुणे यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहीतीस्तव व उचित कार्यवाहिस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली यांना माहीतीस्तव व उचित कार्यवाहिस्तव अग्रेषित. सदर बाब आपले अधिनिस्त कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व शाळांचे मुख्याध्यापकांचे निदर्शनास आणून दयावी व उपरोक्त निर्देशानूसार कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.
4) संगणक शाखा, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांना माहीतीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.
5) शाखाप्रमुख / शाखाधिकारी परीक्षा उच्च माध्यमिक /परीक्षा माध्यमिक / लेखा यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

# महाराष्ट्र शासन

क्रमांक प्रवेश २०१७/प्र.क्र.२५०/एस.डी.२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक :-९ ऑगस्ट,२०१८

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
४) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद

म.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ
पुणे-४११००४
सह सचिव
सहा. सचिव
09 AUG 2018
अध्यक्ष
सचिव
आवक क्रमांक :- 3429
शाखा :-

विषय :- इयत्ता ११ वी मध्ये मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याबाबत.

शहरालगतच्या ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा (Intake Capacity) जादा प्रवेश होत आहेत. अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. यानुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

(१ ) महानगरपालिका क्षेत्रातील जवळच्या ग्रामीण भागातील परिसरांमध्ये असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये, प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत किंवा कसे हे तपासण्यासाठी सर्व शैक्षणिक विभागांमध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या अध्यक्षतेखाली किमान ४ भरारी पथकांची स्थापना करण्यात यावी. सदर प्रत्येक भरारी पथकामध्ये मान्यताप्राप्त व प्रतिष्ठित उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांच्या निवडक ३ प्राचार्यांचा समावेश राहील.

(२) सदर भरारी पथकांनी शाळांना भेटी देऊन, ज्या कनिष्ठ महाविद्यालयात / उच्च माध्यमिक विद्यालयात, प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक मुलांना प्रवेश देण्यात आला आहे, अशांची यादी विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावी. विभागीय शिक्षण संचालकांनी सदर यादी शासनास तात्काळ सादर करावी.

(३) ज्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले आहेत, त्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावरून अतिरिक्त विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करावेत.

शाखा/ परीक्षा
मा. सचिव
मा. अध्यक्ष

(४) एखाद्या उच्च माध्यमिक विद्यालयाने / कनिष्ठ महाविद्यालयाने प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असल्यास, सदर जादा विद्यार्थ्यांना इ.१२ वी च्या परीक्षेत बसता येणार नाही. त्यामुळे क्लास/संस्था यांच्या सांगण्यावरुन ज्या विद्यार्थ्यांनी अशा शाळांमध्ये प्रवेश घेतला असल्यास, विद्यार्थ्यांनी असे प्रवेश रद्द करुन मंजूर प्रवेशित क्षमतेच्या कनिष्ठ महाविद्यालयातच प्रवेश घ्यावेत, अशा सूचना सर्व पालकांना / विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

(५) ज्या ६ महानगर क्षेत्रामध्ये इ.११ वी ची प्रवेश प्रकिया ऑनलाईन पध्दतीने होत आहे. त्या महानगर क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश लगतच्या ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक विद्यालये /कनिष्ठ महाविद्यालये यामध्ये घेतले असल्यास आणि सदर उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रविष्ठ असल्यास सदर विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश तात्काळ रद्द करून ऑनलाईन प्रक्रियेमध्ये यावे व त्यामधून प्रवेश घ्यावे, अशा सूचना सर्व पालकांना / विद्यार्थ्यांना द्याव्यात.

(६) सर्व उच्च माध्य. शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांची 'सरल' मधील माहिती दि.३० सप्टेंबर पर्यंत अपडेट करणे आवश्यक राहील. उच्च माध्य. शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांची मंजूर प्रवेश क्षमता, प्रवेशित विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची सरल मधील माहिती विचारात घेऊनच राज्यमंडळाने इ.१२ वी च्या परीक्षेचे अर्ज स्वीकारावेत.

(७) या सुचनेप्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या उच्च माध्य. शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच, इ.१२ वी च्या परीक्षेस बसण्याची संधी न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विद्यार्थ्याची राहील.

वरील सर्व निर्णयांच्या अनुषंगाने आवश्यक सूचना सर्व क्षेत्रिय यंत्रणांना, कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक शाळांना, पालकांना व विद्यार्थ्यांना शिक्षण संचालक (माध्यमिक) व अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या स्तरावरून तात्काळ देण्यात याव्यात.

(डॉ.सुवर्णा खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा.आयुक्त (शिक्षण), पुणे
३) निवड नस्ती /एस.डी.२

**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in    Telegram : MAHABOSEC, PUNE.

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

क्र.रा.म./परीक्षा-३/४४९६
पुणे - ४११००४
दि.-१८/०८/२०१८ (20)

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषयः-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेची आवेदनपत्रे स्वीकारणेबाबत.

**संदर्भः-** शासन पत्र क्रमांक प्रवेश २०१७/प्र.क्र.२५०/एसडी.२ दि.०९/०८/२०१८

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासन पत्रातील मुद्या क्रमांक ६ नुसार सर्व उच्च माध्य. शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांची 'सरल' मधील माहिती दि. ३० सप्टेंबर पर्यंत अपडेट करणे आवश्यक राहील. उच्च माध्य.शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंजूर प्रवेश क्षमता, प्रवेशित विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची सरल मधील माहिती विचारात घेऊनच इ.१२वी च्या परीक्षेचे अर्ज मंडळाने स्वीकारावेत. सोबत शासन पत्राची प्रत देण्यात येत आहे.

तरी शासन पत्रानुसार आपल्या विभागीय मंडळ अखत्यारीत असलेल्या सर्व उच्च माध्य. शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना आवेदनपत्रे भरण्यासंदर्भात कार्यवाही करणेबाबत कळवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळ कार्यालयास सादर करावा.

प्र. सचिव,
राज्यमंडळ, पुणे- ०४

प्रत माहितीस्तव

१) मा.डॉ.सुवर्णा खरात, सहसचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२) व्यवस्थापक,
गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे

आवक क्रमांक 6596
दिनांक 27-08-18
शाखा
स्वाक्षरी

D:\BAMANE\letter.docx45

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेज
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीन
पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in    Telegram : MAHABOSEC, PUNE.

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 . । EPABX -25705000 Fax : 25665807 ।    Secretary(P) : 25651750

क्र.रा.म./परीक्षा-३/४४२ 4429
पुणे - ४११००४
दि.-१८/०८/२०१८ 29

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषयः-** ''सरल'' प्रणाली अंतर्गत विविध पोर्टल वर माहिती भरणे व ती अंतिम करणे बाबत.

**संदर्भः-** शासन निर्णय क्रमांक ई.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक दि.१४/०८/२०१७

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णयातील मु क्रमांक १५(१) नुसार इयत्ता दहावी/बारावीची मंडळाची आवेदनपत्रे SARAL DATA वरुन Auto Popula पध्दतीने घ्यावी असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयां दिनांक ०१/०९/२०१८ पर्यंत SARAL ची माहिती तपासून ती Update करण्याबाबत व फेब्रुवारी–मार्च २०१ मध्ये आयोजित करावयाच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाण (इ.१२वी)परीक्षांची आवेदनपत्रे (Application Form) SARAL DATA वरुनच भरण्यात यावी अ कळविण्यात यावे.

तसेच इ.१०वी/१२वी आवेदनपत्रे भरणे चालू असतांना शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून विवि अडचणींबाबत सतत फोन येत असतात त्याकरिता त्यांना माहिती देण्याकरीता आपल्या विभागीय मंडळामधील परी शाखा/लेखा शाखा/गणकयंत्र विभाग याची मिळून मोबाईल हेल्प लाईन सुरु करावी व ती सर्व शाळा/कनि महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळ कार्यालयास सादर कराव

प्र. सचिव,
राज्यमंडळ, पुणे- ०४

प्रत माहितीस्तव
व्यवस्थापक,
गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे

आवक क्रमांक 6586
दिनांक 27-8-18
शाखा
स्वाक्षरी

D:\BAMANE\letter.docx43